# माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा शालेय गुणवत्तेसंदर्भातील मतांचा अभ्यास

**डॉ. पी. ओ. चौधरी**
सहाय्यक प्राध्यापक,
आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
शिरपूर, जि. धुळे

**सारांश-**

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा शालेय गुणवत्तेसंदर्भात मतांचा अभ्यास वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात आला होता. सहेतूक नमुना निवड पद्धतीने एकूण ८७ शिक्षकांची निवड करण्यात आली होती. प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक माहिती प्राप्त करण्यासाठी संशोधकाने स्वनिर्मित शालेय गुणवत्ता चाचणींचा अवलंब केला होता. प्रस्तुत संशोधनातील माहितीचे संकलन करण्यासाठी टक्केवारी या परिमाणाचा अवलंब केला होता. माध्यमिक शाळेत आजमितीस गुणवत्ता वाढीसाठी चांगले प्रयत्न सुरू आहेत. अधिकतर शिक्षकांच्यामते अध्ययन अध्यापनात शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास गुणवत्ता वाढते, प्रभावी शिक्षक आणि योग्य वातावरण, शिक्षण हक्क कायदयाची योग्य अमंलबजावणी, सातत्यपूर्ण मूल्यमापन, उपचारात्मक अध्यापन या बाबींचा शाळेत योग्य पद्धतीने हाताळणी होत असेल तर शाळेत गुणवत्ता वाढते.

**प्रस्तावना-**

आजच्या या नवीन युगात बदलत्या काळानूसार शिक्षणात बदल होणे गरजेचे आहे. नवीन विचारांचा शिरकाव अध्ययन, अध्यापन आणि मूल्यमापनात आला पाहिजे. जेणे करून शिक्षणाची गुणवत्ता वाढेल. शासन केंद्र स्तरावरील असो वा राज्य स्तरावरील शिक्षणासाठी अनेक सुविधा पुरविल्या जात आहेत. शिष्यवृत्ती, विविध योजना राबवून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करुन शिक्षणाची गुणवत्ता वाढवली जात आहे. परंतु आजही जर आपण विचार केला तर उच्चशिक्षणाकडे मुलांचा कल अधिक पारंपारिक, ज्याकडे अभ्यासक्रमाकडे इतर प्रवेश घेता आपण पण तिकडेच प्रवेश घेऊ या भावनेने शिक्षणाचा विचार केला जातो आहे. उच्चमाध्यमिक स्तरावर मुलांकडे अधिक लक्ष दिले जात आहे. पालक विविध प्रकारच्या टयुशन, पुस्तके विद्यार्थ्यांना आणून देतात. परंतु मुलांच्या मनाचा विचार पालक करीत नाहीत. कोणता अभ्यासक्रम घ्यावा, कोणते महाविद्यालयात प्रवेश घ्यावा, इतके गुण मिळालेच पाहिजे या विचारात मुलांना गुरफटून टाकले जात आहे. खरतंर शिक्षणाचा आनंद आजचे मुल घेत नाहीच हेच खरे, कारण आपल्याला केवळ आपले व्यक्तिमत्त्व सर्वांगिण दृष्टया विकसीत करावयाचे आहे याबाबत कुठेच विचार होत नाहीत तर मला हीच नौकरी करायची आहे, हाच अभ्यासक्रम घ्यावयाचा आहे. त्याच्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करावयाचे आहे या विचाराचा पगडा सर्वावर पडला आहे. मग शिक्षणाच्या गुणवततेकडे आज शिक्षक, पालक आणि मुलही पाहिजे तितके आपले लक्ष पुरवित नाहीत. गुणवत्ता निर्माण करणे हे आजच्या शिक्षणक्षेत्रात महत्त्वाची बाब आहे.

शाळेतील भौतिक सुविधा, शाळेतील वातावरण, शाळेतील अध्ययन अध्यापनाच परिणामकारकता, शाळेतील हितसंबंध, शाळेतील समाजाचा सहभाग अशा गोष्टींकडे लक्ष देणे अतिशय महत्त्वाचे आहे. योग्य अभ्यासक्रम, अध्ययन आणि त्याचे मूल्यमापन चांगले व्हावा हेही पाहणे गरजेचे असते. शिक्षणातून परिपूर्ण विकास होणे गरजेचे आहे. शिक्षक हा शिक्षणक्षेत्रातील एक महत्त्वपूर्ण भाग असतो. त्याच्यावर विद्यार्थ्यांचा विकास अवलंबून असतो. तो एक आदर्श शिक्षक असतो. तो विद्यार्थ्यांच्या भावनिक, मानसिक, व्यावसायिक जीवनाला मार्गदर्शन करीत असतो. अशावेळेस शाळेतील गुणवत्तेबाबत शिक्षकांचा मत नेमके कसे आहे याचाच अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात आला आहे.

**समस्याविधान-**

शिरपूर तालुक्यातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा शालेय गुणवत्तेसंदर्भात मतांचा अभ्यास करणे.

**उद्दिष्टं -** माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा शालेय गुणवत्तेसंदर्भात मतांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती** -

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा शालेय गुणवत्तेसंदर्भात मतांचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**जनसंख्या व न्यादर्श-** प्रस्तुत संशोधनासाठी शिरपूर तालुक्यातील इयत्ता पाचवी ते दहावी च्या वर्गाला अध्यापन करणारे सर्व स्त्री व पुरूष शिक्षकांची जनसंख्या म्हणून निश्चिती करण्यात आली होती. सहेतूक नमुना निवड पद्धतीने एकूण ८७ शिक्षकांची निवड करण्यात आली होती.

**संशोधन साधन-**

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक माहिती प्राप्त करण्यासाठी संशोधकाने स्वनिर्मित शालेय गुणवत्ता चाचणींचा अवलंब केला होता. प्रस्तुत चाचणीत शालेय गुणवत्तेतील अध्ययन-अध्यापन, भौतिक सुविधा, शालेय वातावरण आणि शालेय प्रशासन या घटकांवर आधारीत एकूण १० विधाने तयार केली होती. प्रतिसाद नोंदविण्यासाठी होय, नाही आणि सांगता येत नाही असे पर्याय देण्यात आले होते.

**संख्याशास्त्रीय परिमाणे-** प्रस्तुत संशोधनातील माहितीचे संकलन करण्यासाठी टक्केवारी या परिमाणाचा अवलंब केला होता.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन-**

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील शिक्षकांना शालेय गुणवत्ता चाचणी देण्यात आली होती. या चाचणीला दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे.

| अ. नं. | विधाने | | सहमत | असहमत | सांगता येत नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अध्ययन अध्यापन प्रक्रियेत शैक्षणिक तंत्रविज्ञानाचा वापर केल्यास शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होते. | प्र | ६७ | १५ | ०५ | ८७ |
| | | ट | ७७ | १७ | ०६ | १०० |
| २ | शिष्यवृत्ती परीक्षेत अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग असल्यास हे शालेय गुणवत्ता वृद्धीचे संकेत आहेत. | प्र | ५३ | २८ | ०६ | ८७ |
| | | ट | ६१ | ३२ | ०७ | १०० |
| ३ | शिक्षण हक्क कायद्यामुळे शाळेच्या गुणवत्तेत वाढ झालेली दिसून येते. | प्र | ६१ | ११ | ०७ | ८७ |
| | | ट | ७९ | १३ | ०८ | १०० |
| ४ | शाळेची गुणवत्ता ही भौतिक सुविधा आणि प्रभावी शिक्षकांवर अवलंबून असते. | प्र | ७७ | ०५ | ०५ | ८७ |
| | | ट | ८८ | ०६ | ०६ | १०० |
| ५ | शालेय गुणवत्ता वाढविण्यासाठी नवीन अभिनव उपक्रमांची आवश्यकता असते. | प्र | ५६ | २२ | ०९ | ८७ |
| | | ट | ६५ | २५ | १० | १०० |
| ६ | शाळेतील समाजाचा सहभागामुळे शाळेच्या गुणवत्ता वाढीवर परिणाम होतो. | प्र | ५९ | २३ | ०५ | ८७ |
| | | ट | ६८ | २६ | ०६ | १०० |
| ७ | शालेय नेतृत्त्वात लोकशाही बरोबरच अधिकारशाही हीच शालेय गुणवत्ता वाढीला उपयोगी आहे. | प्र | १४ | ५३ | २० | ८७ |
| | | ट | १६ | ६१ | २३ | १०० |
| ८ | शालेय गुणवत्तावाढीसाठी शैक्षणिक मानसशास्त्राचा उपयोग शिक्षकांनी केला पाहिजे. | प्र | ६५ | १५ | ११ | ८७ |
| | | ट | ७० | १७ | १३ | १०० |
| ९ | शालेय नेतृत्वाने कामाच केलेली समान वाटणीमुळे शालेय गुणवत्ता टिकून राहण्यासाठी मदत होते. | प्र | ४५ | २७ | १५ | ८७ |
| | | ट | ५२ | ३१ | १७ | १०० |
| १० | सातत्यपूर्ण मूल्यमापन व उपचारात्मक अध्यापन या तत्त्वांचा वापर केल्यास गुणवत्तेत सुधारणा होवू शकते. | प्र | ७१ | ११ | ०५ | ८७ |
| | | ट | ८१ | १३ | ०६ | १०० |

**निरीक्षण व निष्कर्ष:**

१. अध्ययन अध्यापन प्रक्रियेत शैक्षणिक तंत्रविज्ञानाचा वापर केल्यास शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होते या संदर्भात माध्यमिक शाळेतील ६७ (७७%) शिक्षक सहमत, १५ (१७%) शिक्षक असहमत तर ०५ (०६%) शिक्षकांना सांगता येत नाही यावरून असे दिसते की, अध्ययन अध्यापन प्रक्रियेत शैक्षणिक तंत्रविज्ञानाचा वापर केल्यास शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होते.

२. शिष्यवृत्ती परीक्षेत अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग असल्यास हे शालेय गुणवत्ता वृद्धीचे संकेत आहेत या संदर्भात माध्यमिक शाळेतील ५३ (६१%) शिक्षक सहमत, २८ (३२%) शिक्षक असहमत तर ०६ (०७%) शिक्षकांना सांगता येत नाही यावरून असे दिसून येते की, शिष्यवृत्ती परीक्षेत अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग असल्यास हे शालेय गुणवत्ता वृद्धीचे संकेत आहेत.

३. शिक्षण हक्क कायद्यामुळे शाळेच्या गुणवत्तेत वाढ झालेली दिसून येते या संदर्भात माध्यमिक शाळेतील ६१ (७९%) शिक्षक सहमत, ११ (१३%) शिक्षक असहमत तर ०७ (०८%) शिक्षकांना सांगता येत नाही यावरून असे दिसून येते की, शिक्षण हक्क कायद्यामुळे शाळेच्या गुणवत्तेत वाढ झालेली दिसून येते

४. शाळेची गुणवत्ता ही भौतिक सुविधा आणि प्रभावी शिक्षकांवर अवलंबून असते या संदर्भात माध्यमिक शाळेतील ७७ (८८%) शिक्षक सहमत, ०५ (०६%) शिक्षक असहमत तर ०५ (०६%) शिक्षकांना सांगता येत नाही यावरून असे दिसून येते की, शाळेची गुणवत्ता ही भौतिक सुविधा आणि प्रभावी शिक्षकांवर अवलंबून असते.

५. शालेय गुणवत्ता वाढविण्यासाठी नवीन अभिनव उपक्रमांची आवश्यकता असते. या संदर्भात माध्यमिक शाळेतील ५६ (६५%) शिक्षक सहमत, २२ (२५%) शिक्षक असहमत तर ०९ (१०%) शिक्षकांना सांगता येत नाही यावरून असे दिसून येते की, शालेय गुणवत्ता वाढविण्यासाठी नवीन अभिनव उपक्रमांची आवश्यकता असते.

६. शाळेतील समाजाचा सहभागामुळे शाळेच्या गुणवत्ता वाढीवर परिणाम होतो. या संदर्भात माध्यमिक शाळेतील ५९ (६८%) शिक्षक सहमत, २३ (३६%) शिक्षक असहमत तर ०५ (०६%) शिक्षकांना सांगता येत नाही यावरून असे दिसून येते की, शाळेतील समाजाचा सहभागामुळे शाळेच्या गुणवत्ता वाढीवर परिणाम होतो.

७. शालेय नेतृत्त्वात लोकशाही बरोबरच अधिकारशाही हीच शालेय गुणवत्ता वाढीला उपयोगी आहे. या संदर्भात माध्यमिक शाळेतील १४ (१६%) शिक्षक सहमत, ५३ (६१%) शिक्षक असहमत तर २० (२३%) शिक्षकांना सांगता येत नाही यावरून असे दिसून येते की, शालेय नेतृत्त्वात लोकशाही बरोबरच अधिकारशाही हीच शालेय गुणवत्ता वाढीला उपयोगी नाही

८. शालेय गुणवत्तावाढीसाठी शैक्षणिक मानसशास्त्राचा उपयोग शिक्षकांनी केला पाहिजे. या संदर्भात माध्यमिक शाळेतील ६५ (७०%) शिक्षक सहमत, १५ (१७%) शिक्षक असहमत तर ११ (१३%) शिक्षकांना सांगता येत नाही यावरून असे दिसून येते की, शालेय गुणवत्तावाढीसाठी शैक्षणिक मानसशास्त्राचा उपयोग शिक्षकांनी केला पाहिजे.

९. शालेय नेतृत्त्वाने कामांची केलेली समान वाटणीमुळे शालेय गुणवत्ता टिकून राहण्यासाठी मदत होते. या संदर्भात माध्यमिक शाळेतील ४५ (५२%) शिक्षक सहमत, २७ (३१%) शिक्षक असहमत तर १५ (१७%) शिक्षकांना सांगता येत नाही यावरून असे दिसून येते की, शालेय नेतृत्त्वाने कामाच केलेली समान वाटणीमुळे शालेय गुणवत्ता टिकून राहण्यासाठी मदत होते.

१०. सातत्यपूर्ण मूल्यमापन व उपचारात्मक अध्यापन या तत्त्वांचा दीर्घकाळ वापर केल्यास गुणवत्तेत सुधारणा होवू शकते. या संदर्भात माध्यमिक शाळेतील ७१ (८१%) शिक्षक सहमत, ११ (१३%) शिक्षक असहमत तर ०५ (०६%) शिक्षकांना सांगता येत नाही यावरून असे दिसून येते की, सातत्यपूर्ण मूल्यमापन व उपचारात्मक अध्यापन या तत्त्वांचा दीर्घकाळ वापर केल्यास गुणवत्तेत सुधारणा होवू शकते.

**निष्कर्षावर आधारीत चर्चा**

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा शालेय गुणवत्तेसंदर्भात मतांचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधकाने शालेय गुणवत्तेशी संबंधित घटकांवर माध्यमिक शाळेतील शिक्षकांना प्रश्नावलीच्या साहाय्याने काही प्रश्न विचारले होते त्या प्रश्नांना शिक्षकांनी दिलेल्या प्रतिसादाचे विश्लेषण केल्यावर लक्षात येते की, माध्यमिक शाळेत आजमितीस गुणवत्ता वाढीसाठी चांगले प्रयत्न सुरू आहेत. अधिकतर शिक्षकांच्या मते अध्ययन अध्यापनात शैक्षणिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास गुणवत्ता वाढते, प्रभावी शिक्षक आणि योग्य वातावरण, शिक्षण हक्क कायदयाची योग्य अमंलबजावणी, सातत्यपूर्ण मूल्यमापन, उपचारात्मक अध्यापन या बाबींचा शाळेत योग्य पद्धतीने हाताळणी होत असेल तर शाळेत गुणवत्ता वाढते. म्हणूनच शासनाने या मुद्यांकडे लक्ष दिले पाहिजे. प्रत्येक शाळेतील शिक्षकांना आयसीटीचे प्रशिक्षण अनिवार्य केले पाहिजे. शिक्षक परिणामकारकता तपासली पाहिजे, भौतिक सुविधांचा योग्य मेळ घातला पाहिजे. शिक्षकांनी आणि मुख्याध्यापकांनी सुद्धा याबाबींकडे लक्ष दिले पाहिजे. समाजाने आपल्या परिसारातील शाळां परिणामकारकरीत्या अध्ययन अध्यापनाचे कार्य करीत आहेत किंवा नाही याकडे लक्षपूरविले पाहिजे. योग्य मार्गदर्शन सुविधांची व्यवस्था होत असेल तर ती केली पाहिजे.

**संदर्भग्रंथसूची**


1. Aggarwal J.C. (1991). *Educational & Vocational Guidance & Counseling.* New Delhi: Doaba House.
2. Best, J.W. and Khan, K.M. (2002) *Research in Education* (7th Ed) New Delhi: Practice Hall of India.
3. Kothari, C.R. (1990) *Research Methodology, Methods and Techniques*, New Delhi: Wiley Eastern Limited.
4. Mangal, S.K. (2002). *Advanced Psychology,* New Delhi: Prentice Hall of India, Private Limited.

५. आहेर, हिरा. (१९९५) *उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक.* नागपूर: विद्या प्रकाशन.

६. करंदीकर, सुरेश आणि मंगरूळकर (२००२) *उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण.* कोल्हापूर: फडके प्रकाशन.

७. पंडीत, ब.बी. (२००५). *शिक्षणातील संशोधन.* पुणे: नित्य नुतन प्रकाशन.

८. मुळे, आणि उमाठे वि.तु. (१९८७). *शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे.* नागपुर: महाराष्ट्र साहित्य निर्मीती मंडळ.